झुंजार नेता

ड, महाराष्ट्र ■ शनिवार दि. २३ जून २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-20

# आनंदराव धोंडे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा

कडा, दि.२२ (प्रतिनिधी):- निरोगी जिवन जगण्यासाठी प्रत्येकाने नियमित प्राणायाम व योगासने करावीत असे आवाहन अहमदनगर येथील योगशिक्षक घनश्याम दळवी यांनी केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला, यावेळी अहमदनगर येथील घनश्याम दळवी व सौ. छाया दळवी यांनी वेगवेगळ्या प्रकारचे योगासने व प्राणायाम करुन शिखवले. याप्रसंगी बोलताना घनश्याम दळवी यांनी सांगितले की, माणसाच्या जीवनात आज व्यायामाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्ती विविध कामांसाठी सतत धावपळ करीत आहे, धावपळीच्या युगात स्वताकडे दुर्लक्ष करीत आहे, त्यामुळे वेगवेगळ्या आजारांना बळी पडत आहेत. सुखी,समाधानी व आनंदी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाला व्यायामाची गरज आहे. नियमित प्राणायाम व योगासने केल्यास विविध आजारांपासून मुक्ती मिळते असेही दळवी यांनी सांगितले. ग्रंथपाल प्रा डॉ शाम सांगळे यांनी ओंकार उच्चाराचे महत्त्व सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांच्या हस्ते घनश्याम दळवी सौ. छाया दळवी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भास्कर चव्हाण, प्रा डॉ पंडीत औटे, प्रा डॉ जगताप, प्रा डॉ बापु खैरे, प्रा डॉ शाम सांगळे प्रा. डॉ. बाळासाहेब धोंडे, प्रा डॉ मुश्ताक पानसरे, प्रा डॉ सांडु भगत यांच्या सह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

बीड संकेत

संपादक-नरेन्द्र कांकरिया

e-mail- bhrbsanket@gmail.com

सोमवार दि.१६ जुलै २०१८ बीड फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११० R.N.I. No.70487/94 पो.र.नं. एल/१३/एसटीएस/बीड २०

# आनंदवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण



कडा दि.१५ (बातमीदार): आष्टी तालुक्यातील आनंदवाडी (सराटेवडगांव) येथे कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. सत्यमेव जयतेच्या वॉटरकप स्पर्धेत महाराष्ट्रातील पंधरा गावाची निवड झाली यामध्ये आनंदवाडीचा समावेश आहे. याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडीचें उद्दीष्ट समोर ठेवून आनंदवाडी येथे मेहेकरी कॅनालच्या कडेला वड, पिंपळ, करंजी, चिंच, निंब अशा वेगवेगळ्या ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आनंदवाडी हे गांव दत्तक घेण्यात आले आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पंडीत औटे, प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.गायत्री जगताप, प्रा.डॉ.बापु खैरे, प्रा.डॉ.जी.पी. बोडखे, प्रा.डॉ.एम.आर. पटेल, प्रा.डॉ.सज्जन गायकवाड, प्रा.डॉ.जी.एम. पठारे, प्रा.डॉ.मंगल टेकाडे, प्रा.डॉ.एस.ए. खेडकर यांच्यासह ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# झुंजार नेता

महाराष्ट्र ■ सोमवार दि.१६ जुलै २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-20


## आनंदवाडी येथे राष्टीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण

कडा ( वार्ताहर ):- आष्टी तालुक्यातील आनंदवाडी ( सराटेवडगांव ) येथे कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्टीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. सत्यमेव जयतेच्या वॉटरकप स्पर्धेत महाराष्टातील पंधरा गावाची निवड झाली यामध्ये आनंदवाडीचा समावेश आहे. याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दीष्ट समोर ठेवून आनंदवाडी येथे मेहेकरी कॅनालच्या कडेला वड, पिंपळ,करंजी,चिंच,निंब अशा वेगवेगळ्या ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्टीय सेवा योजनेच्या वतीने आनंदवाडी हे गांव दत्तक घेण्यात आले आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ हरीदास विधाते, सरपंच प्रा डॉ राम बोडखे, उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ पंडीत औटे, प्रा डॉ भास्कर चव्हाण, प्रा गायत्री जगताप, प्रा डॉ बापु खैरे,प्रा डॉ जी पी बोडखे, प्रा डॉ एम आर पटेल, प्रा डॉ सज्जन गायकवाड,प्रा डॉ जी एम पठारे, प्रा डॉ मंगल टेकाडे, प्रा डॉ एस ए खेडकर, यांच्या सह ग्रामस्थ व राष्टीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

वर्ष : १३८

Regd. No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1756/57

# केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक १९४ ● पृष्ठे : १० ● चार रुपये ● सोमवार, १६ जुलै २०१८, पुणे C (अहमदनगर आवृत्ती)★★



## आनंदवाडी येथे 'रासेयो'तर्फे वृक्षारोपण

**कडा, (वार्ताहर) :** आष्टी तालुक्यातील आनंदवाडी (सराटेवडगांव) येथे कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले. सत्यमेव जयतेच्या वॉटरकप स्पर्धेत महाराष्ट्रातील पंधरा गावाची निवड झाली यामध्ये आनंदवाडीचा समावेश आहे. याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या वृक्षलागवडीचे उद्दीष्ट समोर ठेवून आनंदवाडी येथे मेहेकरी कॅनालच्या कडेला वड, पिंपळ, करंजी, चिंच, निंब अशा वेगवेगळ्या ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आनंदवाडी हे गांव दत्तक घेण्यात आले आहे.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

झुंजार नेता

हाराष्ट्र ■ मंगळवार दि. ७ ऑगस्ट २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 20

# आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथे रक्तदान शिबीर, मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

कडा ( वार्ताहर ):- आष्टी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा राष्टीय सेवा योजना विभाग, गंगाई फार्मसी महाविद्यालय, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर , वृक्षारोपण व मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या. एकुण ६३ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरास आ. भीमराव धोंडे यांनी भेट दिली.



कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर अहमदनगर येथील जनकल्याण पतपेढीचे डॉ. विलास मढीकर, डॉ. काळे,फार्मसी कॉलेजचे प्रा. अशोक गदादे, चेअरमन दादासाहेब हजारे, संजय भोजने, देशमुखनाना, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, शिल्पकार विलास भालेराव, राजु रासकर, राजु शिंदे, जयंत खंदारे , प्रा. डॉ. पंडीत औटे उपस्थित होते यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले की, संस्थापक अध्यक्ष व आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या अनेक वर्षापासून महाविद्यालयात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे, प्रत्येकाने रक्तदानाला प्रोत्साहन देण्याचे काम करावे. यावेळी डॉ. विलास मढीकर यांनी सांगितले की, आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर होत आहे ही कौतुकास्पद बाब आहे, एकदा रक्तदान केल्यानंतर तीन महिन्यानंतर रक्तदान करावे, रक्तदात्यांमध्ये रक्तदान केल्याने विविध आजार कमी होतात. डॉ काळे यांनी सांगितले की, रक्तदान केल्याने रक्त कमी होत नाही तर नविन रक्ताची निर्मिती होते, तसेच आपले नातेवाईक व मित्र परिवार किंवा गरजु रुग्णांना मदत होते. यावेळी प्रा. अशोक गदादे व इतरांची भाषणे झाली. सर्वप्रथम प्रा. डॉ. बाळासाहेब गोरे यांनी रक्तदानाचा हक्क बजावला. यावेळी सावता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष संजय भोजने यांनी व त्यांच्या पत्नी सौ. मनिषा भोजने यांनी रक्तदानाचा हक्क बजावला. यावेळी फार्मसी महाविद्यालयाच्या गजानन गिरी या विद्यार्थ्यांने देहदानाचा संकल्प केला. एकुण ६३ जणांनी रक्तदानाचा हक्क बजावला. मॅरेथॉन स्पर्धेत कृष्णा कर्डीले प्रथम,ज्ञानेश्वर वाळके व्दितीय, सतिष गर्जे तृतीय व अजय भवर यास प्रोत्साहनपर रोख बक्षीस देण्यात आले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले यांनी मानले.

Programme Officer
N. S. S ... Mahavidyalaya,
Kada ... Dist. Beed.

४

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
बुधवार दि.२९ ऑगस्ट २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMA

LIBRARY
Anandrao Dhonde ... College Kada

## धोंडे महाविद्यालयाची तेरा हजारांची मदत

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कडा गावातुन मदत फेरी काढुन केरळमधील पुरग्रस्तांसाठी १३४६५ रुपये गोळा केले. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.डॉ.आर.जी विधाते, प्रा.श्रीमती कुचेकर, यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कडा गावात विद्यार्थ्यांची मदत फेरी काढली, यामध्ये १३४६५ रुपये गोळा झाले. यावेळी गावातील लहान मोठे व्यावसायिक, नोकरदार, शेतकरी यांनी सढळ हाताने मदत केली. याप्रसंगी मदत फेरीमध्ये प्रा.डॉ.पटेल, प्रा.डॉ.बोडखे डी.एस., प्रा.डॉ.जी.पी.बोडखे, प्रा.डॉ.जगताप जी.एस.,प्रा.डॉ.एस.ए.खेडकर, प्रा.शिवाजी वनवे, प्रा.गाडे यांच्या सह इतर शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ बुधवार दि.२९ ऑगस्ट २०१८ R.N.I.N... Postal No - L/29/RNP/ Beed/ 2

## केरळमधील पुरग्रस्तांसाठी धोंडे महाविद्यालयाची मदत फेरीतुन १३४६५ रूपये जमा



कडा, दि.२८ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कडा गावातुन मदत फेरी काढुन केरळमधील पुरग्रास्तांसाठी १३४६५ रुपये गोळा केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, काही दिवसांपूर्वी केरळमध्ये आलेल्या प्रचंड महापुराने कोट्यावधी रुपयांची हानी झाली तसेच शेकडो लोकांचा बळी गेला. देशातुन केळसाठी मोठ्या प्रमाणावर मदत देण्यात आली. ग्रामीण भागात देखील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावात मदत फेरी काढुन खारीचा वाटा उचलला. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात प्राचार्य डॉ हरीदास विधाते, उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. आर जी विधाते, प्रा श्रीमती कुचेकर, यांनी राष्टीय सेवा योजनेच्या माध्यमातून कुडा गावात विद्यार्थ्यांची मदत फेरी काढली, यामध्ये १३४६५ रुपये गोळा झाले. यावेळी गावातील लहान मोठे व्यावसायिक, नोकरदार , शेतकरी यांनी सढळ हाताने मदत केली. याप्रसंगी मदत फेरीमध्ये प्रा डॉ पटेल, प्रा डॉ बोडखे डी एस, प्रा डॉ जी पी बोडखे,प्रा डॉ जगताप जी एस ,प्रा डॉ एस ए खेडकर,प्रा. शिवाजी वनवे , प्रा. गाडे यांच्या सह इतर शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ३७७०७/१९८२ । वर्ष : ३७ अंक : २२८ www.facebo

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.00 औरंगाबाद, बुधवार, दि. २९ ऑगस्ट २०१८





## आनंदराव धोंडे कॉलेजची पूरग्रस्तांसाठी मदतफेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा : केरळ येथील पुरग्रस्तांसाठी खारीचा वाटा म्हणून आनंदराव **धोंडे** ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा येथील विद्यार्थिनींनी मंगळवारी शहरातून मदत फेरी काढली. **या फेरीतून** जमा झालेली रक्कम केरळ **येथील** पूरग्रस्तासाठी देण्यात येणार **आहे**. या रॅलीत प्रा. श्याम सांगळे, प्रा.आर.जी. विधाते, प्रा.बी. एम. चव्हाण, प्रा.पी. एन.औटे, प्रा.बी. एम. वाघुले, प्रा.एस.एस.टेकाडेसह विद्यार्थी सहभागी झाले होते.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
२५४ ■ गुरुवार दि. ४ ऑक्टोबर २०१८ ■ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHI

## गांधी जयंतीनिमित्त शिवकालीन बारवाची केली स्वच्छता



कडा । वार्ताहर

आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कडा शहरातील शिवकालीन बारव व परिसरात स्वच्छता करीत सुमारे एक ट्रॅक्टर कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य व महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती त्यांना अभिवादन करुन सकाळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली व साचलेला कचरा जाळुन नष्ट केला. त्यानंतर कडा शहरात मध्यवस्तीत असलेल्या शिवकालीन बारव व परिसर अस्वच्छ झाला होता. प्राचार्या सह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवकालीन बारव परिसरात हातात झाडू घेऊन स्वच्छता, परिसरातील काटेरी झाडे झुडपे तोडून टाकले,त्याचप्रमाणे पंधरा ते वीस शिक्षक शिवकालीन बारवात उतरले सर्व पायऱ्यांची सफाई करुन आठवडी बाजाराच्य लोकांनी टाकलेला कचरा घमिल्याने वर काढला, सुमारे एक ट्रॅक्टर भरुन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. याप्रसंगी माजी ग्रा पं सदस्य शंकरराव देशमुख, उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले, विद्यमान सदस्य बाळासाहेब देशमुख,बंटी गायकवाड, पप्पु धुमाळ, काशिनाथ कर्डीले, दाणी मामा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भास्कर चव्हाण, प्रा डॉ रघुनाथ विधाते, प्रताप परदेशी, मिलिंद देशमुख, सुधिर देशमुख, जयंत देशमुख व इतर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सकाळ औरंगाबाद, गुरुवार, ४ ऑक्टोबर २०१८

SakalNews @esakalupdate www.esakal.

Today

बीड

१०५ गावांना करणार पाणीपुरवठा » 3



**कडा :** येथील शिवकालीन बारवेची मंगळवारी स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## कडा येथे स्वच्छता मोहीम

**कडा :** राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (ता. दोन) कडा येथील शिवकालीन बारव परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सुमारे एक ट्रॅक्टर कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवायोजना विभाग व आजीवन शिक्षण विभाग यांच्या वतीने ही मोहीम राबविण्यात आली. यात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी हातात झाडू घेऊन परिसराची स्वच्छता केली.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

मंगळवार दिनांक २ ऑक्टोबर २०१८ ■ पाने ८ ■ आर.एन.आय.:एम.ए.एच.एम.ए.आर./२०१६/६८३६१ ■ पोस्टल परवाना क्र. : L/RNP/Beed/40/2016-18 ■ E-mail : karyarambhbeed@gmail.com

दिवसाचा शुभारंभ...

# कार्यारंभ

किंमत ३ ₹

■ संपादक : शिवाजी सोनाजीराव रांजवण पाटील ■ Web : www.karyarambh.com



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

संपादक

## धोंडे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली कडा शहरात साफ सफाई

■ समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेतून हाती झाडू

प्रतिनिधी । कडा



दि. १ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कडा शहरामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला ▸▸ पान ७ वर

### धोंडे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी........

हार घालुन परिसरामध्ये झालेला कचरा हातात, झाडु घेऊन साफ सफाई करत शहरामध्ये स्वच्छता मोहिम राबवली आहे. त्यांच्या समवेत कॉलेजचे डॉ.प्राचार्य हरिदास विधाते, डॉ.प्रा.चव्हाण, डॉ.प्रा.पानसरे, प्रा.राम बोडखे, डॉ.प्रा.सय्यद, सरपंच पती अनिल ढोबळे, उपसरपंच संभाजी कर्डीले, ग्रामसेवक मुळीक तसेच ग्रा.प.सदस्य यांनी देखील हातात झाडू घेऊन शहरात साफ सफाई केली.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada. T. I. Ashti, Dist. Beed

अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड़ दैनिक

बीड

मंगळवार । दि. २ ऑक्टोबर २०१८ । वर्ष २, अंक २६५ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाच




कडा : स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

## स्वच्छता मोहिमेत विद्यार्थिनींचा सहभाग

कडा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या विद्यार्थिनींनी कडा शहरामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून परिसरामध्ये स्वच्छता केली. यावेळी विद्यार्थिनींनी हातात झाडू घेत पुतळा परिसरातील कचरा गोळा केला. यावेळी डॉ. प्राचार्य हरिदास विधाते, डॉ. प्रा. चव्हाण, डॉ. प्रा. पानसरे, प्रा. राम बोडखे, डॉ. प्रा. सय्यद, आनिल ढोबळे, उपसरपंच संभाजी कर्डीले, ग्रामसेवक मुळीक आदी उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# झुंजार नेता

महाराष्ट्र ■ गुरुवार दि.२७ सप्टेंबर २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018


बीड-महाराष्ट्र

महत्त्वाचे...

## आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय योजनेचा वर्धापनदिन साजरा

कडा,दि.२६(प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापनदिना निमित्ताने कार्यक्रम घेण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापनदिना निमित्ताने कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. बापु खैरे, प्रा. डॉ जी पी बोडखे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विधाते उपस्थित होते. अध्यक्ष पदावरून बोलताना उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या महाविद्यालयाने अनेक गावांत श्रमदान केले आहे. त्यामुळे विकास कामे झाली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवकांना स्वयंशिस्तीचे धडे मिळतात. सर्वांगीण विकासासाठी युवकांना रा. से. यो. महत्त्वपूर्ण आहे. यापुढेही युवकांनी श्रमदान करून विकास कामे करत महाविद्यालयाचे नावलौकिक करावे. यावेळी प्रा. डॉ बापु खैरे यांनी सांगितले की, युवकांमध्ये रा से यो मुळे विधायक कामाची आवड निर्माण होते तसेच श्रमदानाची सवय लागते. प्रा. डॉ. जी. पी. बोडखे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये समता, बंधुभाव, नैतिकता व स्वातंत्र्य ही मुल्य रुजविण्याचे काम करते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भास्कर चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.शैलजा कुबेकर यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ नवनाथ चौधरी, प्रा. डॉ. पंडीत औटे, प्रा. गायत्री जगताप,प्रा. कुबेकर, प्रा. डॉ. दत्तात्रय जिरेकर, प्रा. बी. एन.गावडे, प्रा. डॉ. पटेल एम आर यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

# झुंजार नेता

बीड, महाराष्ट्र ■ गुरुवार दि.१ नोव्हेंबर२०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-20


## धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन साजरा

कडा ,दि.३१(प्रतिनिधी):-कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात, सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म दिवस हा राष्टीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेची पुजा करुन अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना राष्टीय एकतेची शपथ देण्यात आली, यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरीदास विधाते, उप-प्राचार्य डॉ. बी.एम.वाघुले उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी सांगितले की, आपल्या देशाची एकता, अखंडता व सुरक्षितता अबाधित ठेऊन देशाच्या प्रती आपली निष्ठा मजबूत करण्यास उत्तेजन मिळण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांचा दि. ३१ ऑक्टोंबर हा जयंती दिन दरवर्षी राष्टीय एकता दिवस म्हणून संपूर्ण देशभर साजरा करण्यात येतो. राज्यात एकता शपथ, एकता दौड व इतर कार्यक्रमांचे सर्वत्र आयोजन करण्यात येत आहे. यावेळी प्रा. एस. डी. ओव्हाळ यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना एकता दिनाची शपथ दिली. याप्रसंगी प्रा. आय. जी. ननवरे, प्रा.डॉ.शाम सांगळे,प्रा. डॉ. एस. डी.गायकवाड, राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. चव्हाण बी. एम, प्रा. डॉ. आर. जी. विधाते, प्रा.श्रीमती शैलजा कुचेकर व इतर प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा डॉ भास्कर चव्हाण यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी मानले.

Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada
LIBRARY

झुंजार नेता

. महाराष्ट्र ■ बुधवार दि.२८ नोव्हेंबर२०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201

# संविधान ही देशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मोठी देणगी–विधाते

कडा, दि.२७ (प्रतिनिधी):- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक प्रयत्नातून भारतीय संविधान निर्माण झाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशाला संविधान मिळाले, ही एक मोठी देणगी आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी आनंदराव धोंडे महाविद्यालयात संविधान दिनाच्या कार्यक्रमनिमित्त केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्टीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुजा करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. संभाजी ओव्हाळ, प्रा. डॉ. बापु खैरे, प्रा. डॉ. नवनाथ चौधरी, प्रा. डॉ. भाऊसाहेब काळे, प्रा. शैलजा कुव्वेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले की, भारतीय संविधानाने जात, धर्म, वंश, लिंग आणि



जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव करता येणार नाही, याची हमी भारतीय संविधानाने दिली. भारतीय संविधानाने आपल्याला सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व दिले. प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. संविधानाचा आदर, संवर्धन आणि संविधानाचे रक्षण करणे हे आपल्या प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. यावेळी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगुन संविधानाचे महत्व सांगितले. प्रा. संभाजी ओव्हाळ यांनी संविधानाचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्यासह प्रा. डॉ. गोरक्ष पठारे, प्रा. डॉ. महेमुद पटेल, प्रा. डॉ. दिलीप बोराडे, प्रा. विजय पोकळे, प्रा. भीमराव गावडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. डॉ. संदीप अनारसे, प्रा. डॉ. ईश्वर ननवरे, प्रा. किरण कटकेव इतर उपस्थित होते.

# संविधान ही देशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मोठी देणगी - प्राचार्य विधाते

कडा दि.२ (प्रतिनिधी) :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक प्रयत्नातून भारतीय संविधान निर्माण झाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशाला संविधान मिळाले, ही एक मोठी देणगी आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी आनंदराव धोंडे महाविद्यालयात संविधान दिनाच्या कार्यक्रमनिमित्त केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्टीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरीदास विधाते होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुजा करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. संभाजी ओव्हाळ, प्रा. डॉ. बापु खैरे, प्रा. डॉ. नवनाथ चौधरी, प्रा. डॉ. भाऊसाहेब काळे, प्रा. शैलजा कुव्वेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले की, भारतीय संविधानाने जात, धर्म, वंश, लिंग आणि जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव करता येणार नाही, याची हमी भारतीय संविधानाने दिली. भारतीय संविधानाने आपल्याला सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व दिले. प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. संविधानाचा आदर, संवर्धन आणि संविधानाचे रक्षण करणे हे आपल्या प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. यावेळी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगुन संविधानाचे महत्व सांगितले. प्रा. संभाजी ओव्हाळ यांनी संविधानाचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्यासह प्रा. डॉ. गोरक्ष पठारे, प्रा. डॉ. महेमुद पटेल, प्रा. डॉ. दिलीप बोराडे, प्रा. विजय पोकळे, प्रा. भीमराव गावडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. डॉ. संदीप अनारसे, प्रा. डॉ. ईश्वर ननवरे, प्रा. किरण कटकेव इतर उपस्थित होते.

पाणी फौंडेशन कार्यशाळा 17/01/2019


# झुंजार नेता

राष्ट्र ■ शुक्रवार दि.१८ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201


## पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून युवकांनी विकास साधावा-भोईटे



कडा, दि.१७ (प्रतिनिधी):- युवकांनी ग्रामीण भागातील पाणी समस्यांवर कायमची मात करण्यासाठी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून श्रमदानातून गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन सत्यमेव जयते पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक बिभीषण भोईटे यांनी केले. याबाबत अधिक माहिती अशी की, सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन आयोजित युवा शक्तीचे युद्ध दुष्काळ विरुद्ध या बाबत कार्यशाळा कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक बीभिषण भोईटे, ॲड. रविंद्र पोमने, शहाजी शिंदे, तालुका समन्वयक कैलास पन्हाळकर, अनिकेत खेडकर, उपसरपंच देवकर, समाधान येलपल्ले यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुजा करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना भोईटे यांनी सांगितले की, दिवसेंदिवस पाणी समस्या बिकट होत चालली आहे. पाणी समस्या कायमची सोडविण्यासाठी गावागावात पाणी बचतीबाबत जनजागृती झाली पाहिजे. गावपातळीवर युवकांनी श्रमदानातून पावसाचे पडलेले पाणी जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत. यावेळी उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले व इतरांची भाषणे झाली. कार्यशाळेचे निमित्ताने पाणी फाऊंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांना पाणी अडवा पाणी जिरवा यावर आधारित वेगवेगळे प्रयोग दाखविण्यात आले. यावेळी पाणी फाऊंडेशनचे तांत्रिक प्रशिक्षक अपेक्षा सुपेकर, प्रशांत माने, ईश्वर नलावडे, नाथसाहेब सरक, उज्जवला गावडे, प्राची भुतकर, स्नेहा अतुगडे,, पुजा जगताप, अशोक इंगोले, ऋषीकेश तांबिले यांनी प्रात्यक्षिकाव्दारे मार्गदर्शन केले व विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. शाम सागळे यांनी मानले.

बीड

# लोकप्रश्न

epaper : www.lokprashna.com

■ गुरुवार, दि. ३१ जानेवारी २०१९ ■ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHM

## नवमतदारांनी मतदार यादीत नोंदवावे-विधाते

कडा । वार्ताहर

मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी प्रत्येक पात्र युवकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदानाचा पवित्र हक्क बजावावा असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी केले. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला, या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून प्राचार्य डॉ. विधाते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तलाठी पोपट गोरे, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, डॉ. बापु धोंडे उपस्थित होते.

आनंदराव धोंडे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राज्यशास्त्र विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षपदावरून पुढे बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, भावी लोकशाहीची धुरा आता सर्व नवमतदारांवर

◀◀ पान २ वर

### नवमतदारांनी मतदार यादीत

अवलंबून आहे, ज्यांचे वय १८ वर्ष पूर्ण आहे, त्यांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी तसेच आपल्या मित्र परिवारांला आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी सांगावे. भारतीय लोकशाही प्रगल्भ लोकशाही आहे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात होत आहे. मतपत्रिकेव्दारे मतदान करणे म्हणजे आधुनिकता सोडून पौराणिकतेकडे जाण्यासारखे आहे. देशाची लोकशाही प्रगल्भ व आणखी सक्षम करण्यासाठी युवकांनी मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक निवडणुकीत आपला पवित्र असा मतदानाचा हक्क बजवावा व चांगल्या आणि चारित्र्यवान उमेदवाराला मतदान करून त्यांना समाज कार्याची संधी द्यावी. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विठ्ठलराव हुलगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. सज्जन गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

पुण्य नगरी

गुरूवार, ३१ जानेवारी २०१९



# नवमतदारांनी मतदार यादीत नाव नोंदवावे : प्राचार्य विधाते

**कडा / प्रतिनिधी** : मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी प्रत्येक पात्र युवकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदानाचा पवित्र हक्क बजावावा असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला, या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून प्राचार्य डॉ. विधाते बोलत होते, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तलाठी पोपट गोरे, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, डॉ. बापु खैरे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, भावी लोकशाहीची धुरा आता सर्व नवमतदारांवर अवलंबून आहे, ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण आहे, त्यांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी तसेच आपल्या मित्र परिवारांला आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी सांगावे. भारतीय लोकशाही प्रगल्भ लोकशाही आहे. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात होत आहे. मतपत्रिकेव्दारे मतदान करणे म्हणजे आधुनिकता सोडून पौराणिकतेकडे जाण्यासारखे आहे. देशाची लोकशाही प्रगल्भ व आणखी भक्कम करण्यासाठी युवकांनी मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक निवडणुकीत आपला पवित्र असा मतदानाचा हक्क बजवावा व चांगल्या आणि चारित्र्यवान उमेदवाराला मतदान करून त्यांना समाज कायाची संधी द्यावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विठ्ठलराव हुलगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले, उपस्थितीतांचे आभार डॉ. सज्जन गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ रविवार दि.६ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2


# राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून विकास कामे करण्याची संधी - प्राचार्य डॉ.विधाते

कडा ,दि.५ (प्रतिनिधी):- राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून शिबीरार्थी व ग्रामस्थांना मोठी विकास कामे करण्याची मोठी संधी आहे, सक्षम असा युवक निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून केले जाते. गाडगेबाबा व आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यावस्थापण परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरीदास विधाते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र व आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे ३ जानेवारी ते ९ जानेवारी या कालावधीत जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य हरीदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन राजाराम ननावरे, आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, बबन सुंबरे, शेख बाबा, नबी शेख, शिवाजी शिंदे, बाळासाहेब तरटे, आण्णा मिसाळ व इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रसंत गाडगेबाबा, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांची पुजा करुन अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले, गतवर्षी आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचा पुरस्कार मिळाला यावेळी सराटेवडगावला बक्षीस कसे मिळेल यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत. जलसंवर्धन व जलव्यवस्थापन प्रत्येक व्यक्तीसाठी व देशासाठी मूलभूत गरज बनत चालली आहे. प्रत्येक व्यक्तीला



जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापन याविषयीचेज्ञान असणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास सांगुन, संत गाडगेबाबा यांच्या ग्रामस्वच्छतेचा वारसा आपण चालवु. शिबिर कालावधीत संत गाडगेबाबा यांचे विचार, अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग, दोन हात दुष्काळमुक्तीसाठी जलसंवर्धन व जलव्यवस्थापन, ग्राम नवचेतना शिबिर, योगा व प्राणायाम याचे महत्त्व, हवामान बदल व शेती व्यवसाय, व्यक्तिमत्व विकास, वृक्षसंवर्धन व कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे याचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा. मुख्याध्यापक शिक्षक सिद्धेश्वर शेंडगे यांनी सांगितले की, गतवर्षी देखील शिबीरार्थिंनी चांगले काम केले, संत गाडगेबाबा यांचे समाज कार्य, अशा विविध कार्यक्रमांचे माध्यमातून पुढे चालु ठेवावे. आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जिवनावरील कविता त्यांनी सादर केली. आदर्श सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी सांगितले की, शिवीराचे माध्यमातून गावाच्या विकासासाठी चालना मिळेल यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे. सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यानेच आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचे बक्षीस मिळाले आहे. दुष्काळ ही एक सुवर्णसंधी आहे असे समजून सराटेवडगाव येथील युवक व ग्रामस्थांनी विकासासाठी सहकार्य करावे. प्रा. डॉ. सज्जन गायकवाड यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेतुन बरेच काही शिकण्यासारखे आहे याचा शिबीरार्थी व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा. याप्रसंगी कु. राजश्री तरटे, कु. ननवरे व इतरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्ता नरसाळे यांनी मानले.

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक ११ जानेवारी २०१९ शुक्रवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.


# राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे कार्य कौतुकास्पद-आ.भीमराव धोंडे

कडा (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय व ग्रामपंचायत सराटेवडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर दि.३ जाने.ते ९ जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा या विशेष शिबीराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.



प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे संचालक डा.प्रकाश देशमुख, प्राचार्य डा.हरिदास विधाते, बाबुशेठ भंडारी , पंचायत समिती सदस्य भानुदास बोडखे, सरपंच प्रा.डा.राम बोडखे , उपसरपंच महादेव शिंदे , बबन सुबरे , राजाराम नन्नवरे , , पानी फौऊंडेशनचे जिल्हा समन्वय देविदास पवार , कैलास पन्हाळकर पान ६ वर...

## राष्ट्राय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे

दादा बोडखे , रामदास तरटे ,शरिफखान पठाण ,बबन सुबरे . एस.के.बोडखे, प्रा.डॉ.जी.पी.बोडखे , ग्रामसेवक बलभीम परकाळे , प्राचार्य सुरेश बोडखे , कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण , अदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरात ग्रामस्वच्छता , हागणदारीमुक्त गाव , जलसाक्षरता , पर्यावरण संरक्षण , एडस जनजागृती ,व्यसनमुक्ती , वृक्षारोपन , अंधश्रध्दा निर्मुलन व सक्षम युवक हे विविध उपक्रम राबविण्यात आले.यावेळी रा.से.यो.शिबीराचे अहवाल वाचन प्रा.डा.भास्कर चव्हाण यांनी केले. सात दिवासीय शिबीरात दररोज रात्री ८ ते १० यावेळात नामांकीत व्याख्यात्यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. आ.धोंडे पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की , युवकांचा सामाजिक कार्यात सहभाग असला की ते काम उत्कृष्ट होत आसते. सराटेवडगाव मध्ये स्वच्छतेचे व जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाचे झालेले काम कौतुकास्पद आहे. आनंदवाडी येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे रासेयो च्या युवकांचे सलग तीन वर्षे शिबीर झाले. पानी फाऊंडेशनचे काळात चांगला सहभाग होता. आनंदवाडीने बक्षिस पटकाविले आहे. आता सराटेवडगांव येथे शिबीर आहे याही गावास पानी फाऊंडेशनचे कामात मदत करावी असे आवाहन केले .सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे यांनी सराटेवडगांव ग्रामस्थांना आगामी पानी फाऊंडेशनचे वाटरकप स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. मेहकरीनदी स्वच्छ व वेडीबाभळमुक्त केल्याचे सांगीतले. बहारदार संचलन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर जी. विधाते यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. शैलजा कुचेकर यांनी मानले.

सकाळ | बीड
औरंगाबाद, रविवार, ६ जानेवारी २०१९
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800




सराटेवडगाव (ता. आष्टी) : राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते.

## सराटेवाडीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

**कडा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र व आनंदराव धोंडे महाविद्यालयातर्फे आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे तीन ते नऊ जानेवारी या कालावधीत 'जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा' यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले. शनिवारी (ता. पाच) शिबिराचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष राजाराम ननावरे, सरपंच राम बोडखे, आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, बबन सुंबरे, शेख बाबा, नबी शेख, शिवाजी शिंदे, बाळासाहेब तरटे, अण्णा मिसाळ यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्र संत गाडगेबाबा, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

पुण्य नगरी
smart Beed

# शिबिराच्या माध्यमातून विकासाची संधी :डॉ. विधाते

**कडा / प्रतिनिधी :** सक्षम असा युवक निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे शिबिराच्या माध्यमातून विकास करण्याची संधी निर्माण होत असल्याचे प्रतिपादन डॉ. हरीदास विधाते यांनी केले.

आनंदराव धोंडे महाविद्यालयचे सराटेवडगाव येथे ३ जानेवारी ते ९ जानेवारी या कालावधीत जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन पार पडले. **यावेळी** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **प्राचार्य हरीदास** विधाते तर **प्रमुख पाहुणे म्हणून** चेअरमन राजाराम **ननावरे**, मुख्याध्यापक सिद्धेश्वर **शेंडगे, बबन सुंबरे**, शेख बाबा, नबी **शेख, शिवाजी शिंदे**, बाळासाहेब तरटे, आण्णा **मिसाळ सह** आदी उपस्थित होते. संत गाडगेबाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले, गतवर्षी आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचा पुरस्कार मिळाला यावेळी सराटेवडगावला बक्षीस कसे मिळेल **यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न** करावेत. **जलसंवर्धन व जलव्यवस्थापन** प्रत्येक व्यक्तीसाठी व देशासाठी मूलभूत गरज बनत चालली आहे. प्रत्येक व्यक्तीला जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापन याविषयीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाला डॉ. भास्कर चव्हाण, सरपंच राम बोडखे, डॉ. सज्जन गायकवाड, राजश्री तरटे, सह आदींची भाषणे झाली.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ गुरुवार दि.१० जानेवारी २०१९, R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2


आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक व कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्टीय सेवा योजनेचे दि.३ ते ९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा या विशेष शिबीराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणुन राष्टीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे संचालक डा.प्रकाश देशमुख , पत्रकार उत्तम बोडखे , प्राचार्य डा.हरिदास विधाते , बाबुशेठ भंडारी , माजी पंचायत समिती सदस्य भानुदास बोडखे , सरपंच प्रा.डा.राम बोडखे , उपसरपंच महादेव शिंदे , बबन पाटील सुबरे , राजाराम नन्नवरे , जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक तथा शिक्षक नेते सिध्देश्वर शेंडगे , पानी फौऊंडेशनचे जिल्हा समन्वय देविदास पवार , कैलास पन्हाळकर , ग्रा.पं.सदस्य दादा बोडखे , रामदास तरटे ,शरिफखान पठाण ,एस.के.बोडखे, प्रा.डा.जी.पी.बोडखे , ग्रामसेवक बलभीम परकाळे , प्राचार्य सुरेश बोडखे , प्रा.डा.भास्कर चव्हाण , प्रा.एस.एन.वाघुले , कार्यक्रमाधिकारी डी.व्हि.नरसाळे, प्रा.बी.ए.रणदिवे आदि मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरात ग्रामस्वच्छता , हागणदारीमुक्त गाव , जलसाक्षरता , पर्यावरण संरक्षण , एडस् जनजागृती ,व्यसनमुक्ती , वृक्षारोपन , अंधश्रध्दा निर्मुलन व सक्षम युवक हे विविध उपक्रम राबविण्यात आले.यावेळी रा.से.यो.शिबीराचे अहवालवाचन प्रा.डा.भास्कर चव्हाण यांनी केले. यावेळी सरपंच प्रा.डा.राम बोडखे ,पत्रकार उत्तम बोडखे , देविदास पवार , प्राचार्य डा.हरिदास विधाते व डा.प्रकाश देशमुख यांची भाषणे झाली.या सात दिवासीय शिबीरात दररोज रात्री ८ ते १० यावेळात नामांकीत व्याख्यात्यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. आ.धोंडे पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की , युवकांचा सामाजिक कार्यात सहभाग असला की ते